# राज्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ नागपूर

## माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये प्राप्त झालेले व्दितीय अपील

माहितीचा अधिकार

**अपील क्रमांक : २८७०/२०१८**

**अपीलकर्ता** श्री. शुभम मनोहर वहाणे,
वार्ड नं. ४, खापरखेडा, ता. सावनेर, जि. नागपूर.

**जन माहिती अधिकारी, औष्णिक विज केंद्र, खापरखेडा,**
ता. सावनेर, जि. नागपूर.

**प्रथम अपीलीय अधिकारी, औष्णिक विज केंद्र, खापरखेडा,**
ता. सावनेर, जि. नागपूर.

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : ०१.१२.२०१८**

| | | |
|---|---|---|
| **अपीलकर्ता** | : | अनुपस्थित |
| **जन माहिती अधिकारी** | : | उपस्थित |
| **प्रथम अपीलीय अधिकारी** | : | उपस्थित |

| मूळ अर्जाचा दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपीलाचा दिनांक | प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्याच्या निर्णयाचा/आदेशाचा दिनांक |
|---|---|---|---|
| १६.०७.२०१८ | निरंक | १६.०८.२०१८ | निरंक |

अपीलकर्त्याने माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ६(१) अन्वये दिनांक १६.०७.२०१८ रोजी जन माहिती अधिकाऱ्याकडे माहितीचा अर्ज सादर केला आहे. सदर अर्जान्वये त्यांनी, " AHP/CHP/Civil maintenance च्या कामाची माहिती" मागिल्याचे दिसून येते.

अपीलकर्ता यांनी आयोगाकडे दिनांक ०६.०९.२०१८ रोजीच्या अर्जान्वये "अपूर्ण माहिती दिल्यामुळे" असे कारण नमुद करून द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर द्वितीय अपील अर्जाच्या अनुषंगाने आज दिनांक ०१.१२.२०१८ रोजी सुनावणी घेण्यात आली. आज रोजी सुनावणी दरम्यान अपीलकर्ता अनुपस्थित असून जन माहिती अधिकारी, औष्णिक विज केंद्र, खापरखेडा,श्री. सुनिल सपटेके व प्रथम अपीलीय अधिकारी तथा उप मुख्य अभियंता, श्री. एम. के. खांडेकर उपस्थित आहेत.

द्वितीय अपील अर्जाच्या सुनावणीच्या वेळी अपीलकर्ता गैरहजर असून त्यांनी दिनांक ३०.११.२०१८ अन्वये दिलेल्या लेखी निवेदनानुसार मागितलेली माहिती समाधानकारकरित्या मिळालेली असून कोणताही उजर राहीला नाही, असे स्वाक्षरीनिशी लिहून दिलेले आहे. त्यामुळे सदर प्रकरणात आयोगाकडून पुढील कोणतीही कार्यवाही अपेक्षीत नसल्याने प्रस्तुत द्वितीय अपील अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालील प्रमाणे आहे.

**आदेश**

प्रस्तुत द्वितीय अपील अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

**(दिलीप ल. धारुरकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ नागपूर**

**नागपूर**
**दिनांक** ०१.१२.२०१८

महाराष्ट्र राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर विभाग
सत्यमेव जयते
नागपूर

जा.क्र.2360 दि. 10 MAY 2019